महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार,डॉ.दा.नौ.मार्ग,मुंबई-४०० ००१. ☎-२२६२०२३१/३२ इमेल:-dirdoa.mum-mah@gov.in

क्रमांक:- डिओअे -२०१९/तीन/1652 दिनांक - 4 OCT 2019

प्रति,

...................................

...................................

...................................

विषय : ६० वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन २०१९-२०.
कलाकार विभाग प्रवेश अर्ज व माहितीपत्रक.

व्यावसायिक कलाकार विभागाचे प्रदर्शन मुंबई येथे दिनांक ०७ जानेवारी ते १३ जानेवारी, २०२० या कालावधीत आयोजित केले जाणार आहे. त्या संदर्भातील माहितीपत्रक व प्रवेश अर्ज सोबत जोडला आहे.

२. प्रदर्शनाच्या प्रवेशिका दि.०५.११.२०१९ ते दि.०६.११.२०१९ या कालावधीत सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत सर ज.जी.कला दालन, कलाशाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग, मुंबई-४०० ००१ येथे स्विकारल्या जातील. प्रदर्शनासाठी निवड न झालेल्या कलाकृती प्रदर्शन संपल्यावर ७ दिवसात परत घेऊन जाण्याची व्यवस्था करावी. या मुदतीत कलाकृती परत न घेऊन गेल्यास त्याची जबाबदारी कला संचालनालयाची राहणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

३. कलाकारांनी अधिवासाबाबतचा (Domicile Certificate) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला दाखला कलाकृती सोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा कलाकृती स्विकारल्या जाणार नाहीत.

४. कलाकृती सोबत कलाकृतींची प्रतिमा JPG Format मध्ये CD स्वरुपात असावी व त्यावर कलाकाराचे नाव व मोबाईल नंबरचा उल्लेख असावा.

(राजीव मिश्रा)
प्र.कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) प्रदर्शन अधिकारी, ६० वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन, मुंबई.
३) सहाय्यक प्रदर्शन अधिकारी, ६० वे महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शन, मुंबई.
४) निवड नस्ती.

# कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

## ६० वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन २०१९-२०

## कलाकार विभाग

## माहितीपत्रक

महाराष्ट्रातील विविध कलाकारांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने सन १९५६ पासून महाराष्ट्र शासन प्रतीवर्षी राज्य कला प्रदर्शन ही सांस्कृतिक महत्वाची योजना राबवित आहे. ५९ वे राज्य कला प्रदर्शन खाली नमूद केलेल्या विभागनिहाय अयोजित करण्याचे ठरविण्यात आलेले आहे. १) रेखा व रंगकला, २) शिल्पकला, ३) उपयोजित कला, ४) मुद्राचित्रण ५) दिव्यांग (अपंग) विभाग या विभागात निवड झालेल्या कलाकृतीस खालीलप्रमाणे पारितोषिक व गुणवत्ता प्रमाणपत्रे देण्यात येतील.

| अ.क्र. | विभागाचे नाव | पारितोषिक संख्या | पारितोषिकाची रक्कम (प्रत्येकी) (रुपयात) |
|---|---|---|---|
| १ | रेखा व रंगकला | ६ | रु.५०,०००/- |
| २ | उपयोजित कला | ५ | रु.५०,०००/- |
| ३ | शिल्पकला | २ | रु.५०,०००/- |
| ४ | मुद्राचित्रण | १ | रु.५०,०००/- |
| ५ | दिव्यांग कलाकार विभाग | १ | रु.५०,०००/- |
| | एकूण | १५ | |

**अटी व नियम :-**

१) प्रदर्शन पात्र, पारितोषिक पात्र कलाकृती निवडीबाबत समितीचा निर्णय अंतीम राहील.

२) स्पर्धक हा महाराष्ट्राचा कायम स्थानिक रहिवाशी असला पाहिजे. अधिवासाबाबतचा दाखला कलाकृतीसोबत सादर करणे आवश्यक असून कलाकृती सोबत दाखला नसल्यास ती स्विकारली जाणार नाही. महाराष्ट्रातील अधिवासाबाबत दाखला संबंधित सक्षम प्राधिकरणाकडून प्राप्त करुन घेण्यात यावा.

३) या माहितीपत्रकातील नमूद केलेले सर्व नियम, अटी व शर्ती यांची पुर्तता न झाल्यास प्रदर्शनासाठी आलेल्या कलाकृती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४) प्रत्येक विभागात दोन पेक्षा अधिक कलाकृती पाठविता येणार नाहीत. कलाकार विभागाच्या प्रदर्शनात सादर करण्यात येणाऱ्या कलाकृतीसाठी (दोन कलाकृतीपर्यंत) रोखीने रु.२००/- शुल्क आकारण्यात येईल. ज्यांनी विद्यार्थी विभागात भाग घेतला असेल किंवा जी व्यक्ती कोणत्याही कला शाखेत विद्यार्थी म्हणून शिक्षण घेत असेल त्यांना कलाकार विभागात भाग घेता येणार नाही.

५) राज्यकला प्रदर्शनात ज्या कलाकारांना एकाच विभागात तीन वेळा पुरस्कार प्राप्त झालेला आहे, अशा कलाकारांच्या कलाकृतींचा पुरस्कारासाठी विचार करण्यात येणार नाही.

६) कला प्रदर्शनामध्ये सादर करण्यात येणाऱ्या सर्व विभागातील कलाकृतींमध्ये दिव्यांग (अपंग) कलाकाराने सादर केलेल्या कलाकृतीस खास पारितोषिक देण्यात येत असल्यामुळे दिव्यांग

कलाकाराने प्रवेश अर्ज सादर करताना अर्जावर वरच्या बाजूस ठळक अक्षरात "दिव्यांग कलाकार" असा उल्लेख लाल शाईने करणे आवश्यक आहे. तसेच अपंगत्व असलेल्या व्यावसायिक कलाकाराला शरीराच्या वरच्या अथवा खालच्या भागातील किमान कायम स्वरुपाची ४० टक्के विकलांगता आहे किंवा वरच्या आणि खालच्या भागातील मिळून कायम स्वरुपाची ५० टक्के विकलांगता असल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र त्यांच्या कलाकृती सोबत सादर करणे आवश्यक आहे.

७) प्रदर्शनामध्ये विक्री होणाऱ्या कलाकृतीच्या विक्रीच्या २० टक्के रक्कम वजाती करुन उर्वरित रक्कम कलाकारास प्रदान केली जाईल व वसूल केलेल्या २० टक्के रकमेची शासकीय पावती संबंधित कलाकाराला देण्यात येईल.

८) कलाकृतीचे विभागानुसार आकारमान खालीलप्रमाणे.

<table>
<tr><th>विभाग</th><th>कमीत कमी</th><th>जास्तीत जास्त</th></tr>
<tr><td>चित्रकला विभाग</td><td rowspan="2">४० से.मी. x ३० से.मी.</td><td rowspan="2">१२० से.मी. ते १५० से.मी.</td></tr>
<tr><td>मुद्राचित्रण विभाग</td></tr>
<tr><td>उपयोजित कला विभाग</td><td rowspan="2">४० से.मी. x ३० से.मी.</td><td rowspan="2">७५ से.मी. x ५० से.मी.</td></tr>
<tr><td>छायाचित्रण विभाग</td></tr>
<tr><td>शिल्पकला विभाग</td><td colspan="2">१२० से.मी. x १२० से.मी. x ९० से.मी.<br>वजन १२५ किलोपेक्षा जास्त नसावे.</td></tr>
</table>

९) एखाद्या विभागात कलाकृतीचा दर्जा पारितोषिकाकरीता पात्र न ठरल्यास त्या विभागाकरिता पारितोषिक दिले जाणार नाही.

१०) प्रदर्शनात पाठविलेली कलाकृती ही अन्य कलाकृतीची नक्कल किंवा प्रतिकृती नसून ती पूर्णत: स्वत:ची निर्मिती असल्याबाबतचे प्रमाणपत्र स्वाक्षरी करुन प्रत्येक कलाकृतीसोबत सादर करणे आवश्यक आहे, सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास सदर कलाकृती प्रदर्शनाकरिता स्विकारली जाणार नाही.

११) प्रत्येक कलाकृती काचेविना योग्य चौकट केलेली असावी. कलाकृती असलेल्या पेटीचे झाकन स्क्रूने बंद करावे.

१२) सोबतच्या पत्रात नमूद केलेल्या तारखेस कलाकृती दिलेल्या पत्त्यावर पोहोचतील अशा बेताने पाठविण्यात याव्यात. नियोजित वेळेनंतर येणा-या कलाकृती स्विकारल्या जाणार नाहीत.

१३) रेल्वे किंवा पोस्ट पार्सलने पाठवायाच्या कलाकृती खालील पत्त्यावर वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात, पार्सलवर **"महाराष्ट्र राज्यकला प्रदर्शनासाठी"** अशा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

**पत्ता :- कला संचालक**
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ.दा.नौ.मार्ग,**
**मुंबई-४०० ००१.**

ज्या पार्सलसाठी या कार्यालयाकडून भाडे द्यावे लागेल अशी पार्सले स्विकारली जाणार नाहीत. तसेच प्रदर्शनासंबंधी सर्व पत्रव्यवहार वर नमूद केलेल्या पत्त्यावर करावा.

१४) **प्रदर्शनासाठी निवड झालेल्या कलाकृतीची योग्य ती देखभाल केली जाईल. परंतु नैसर्गिक किंवा अन्य अनपेक्षित कारणाने कलाकृतीचे नुकसान झाल्यास अथवा ती गहाळ झाल्यास कला संचालनालय जबाबदार राहणार नाही. आवश्यक वाटल्यास पाठविणा-याने कलाकृतीचा विमा उतरवावा.**

१५) कलाकृती विहीत कालावधीत परत न घेऊन गेल्यास जागेच्या अभावी सदर कलाकृती नष्ट करण्यात येतील. त्याबाबतची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. प्रदर्शनासाठी पाठविण्यात येणारी कलाकृती सादर करण्याची व ती विहीत कालावधीत परत नेण्याची जबाबदारी संबंधित कलाकाराची राहिल. विहीत कालावधीत कलाकृती न घेऊन गेल्यास त्या कलाकृतीला हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

१६) कलाकारांची नावे किंवा सही चित्राच्या समोरील बाजूस किंवा चित्रावर असू नये व ती चित्राच्या मागील बाजूस असावी.

१७) प्रत्येक कलाकृतीच्या मागील बाजूस खालील माहिती ठळक व स्पष्ट अक्षरात नमूद करावी व सोबत CD मध्ये कलाकृतीची प्रतिमा JPG Format मध्ये असावी. CD परत केली जाणार नाही.

X-----------------------------------------------------------------------------------------

कलाकाराचे संपूर्ण नांव (इंग्रजीमध्ये) : ..............................................................

आडनांव नांव वडीलाचे नांव

कलाकाराचे संपूर्ण नांव (मराठीमध्ये) ..............................................................

आडनांव नांव वडीलाचे नांव

संपूर्ण पत्ता : ..............................................................
..............................................................
..............................................................

फोन नं. व ई मेल : ..............................................................

विभाग : ..............................................................

कलाकृतीचे शीर्षक : ..............................................................

विक्रीचे शुल्क : ..............................................................

---------- x ----------

## ६० वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन, २०१९-२०
### कलाकार विभाग

विभाग- ______________________________

अनुक्रमांक-

(क्र.व दि.)_________(कार्यालयीन कामकाजाकरीता)

प्रति,
कला संचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

महोदय,

खाली नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण माहिती मी आपणांस सादर करीत आहे.

प्रदर्शकाचे नाव व पत्ता : ______________________________

**कलाकाराचे नाव- (मराठीत मोठया अक्षरात, आडनावाने सुरवात)**

**श्री./श्रीमती/कु. :** ______________________________

Name of the Artist: (In capital letters, Surname first)

Mr./Mrs./Miss.:______________________________

**कलाकाराचा संपूर्ण पत्ता -** ______________________________

______________________________

फोन नं / मो.नं. :__________________

ई-मेल :______________________________

| अ. क्र. | कलाकृतीचे शिर्षक | किंमत (रु.) | स्पर्धेसाठी आहे किंवा नाही |
|---|---|---|---|
| १. | | | |
| २. | | | |

(१) माहितीपत्रकात दिलेले नियम मी वाचले असून ते मला बंधनकारक राहतील हे मी कबूल करतो.

(२) मी असे जाहीर करतो की,

(अ) मी सादर केलेली कलाकृती ही कोणत्याही कलाकृतीची नककल अथवा प्रतिकृती नाही.

(ब) मी आता सादर केलेल्या कलाकृतीस पूर्वी कोणत्याही प्रदर्शनात बक्षीस मिळालेले नाही.

(क) मी महाराष्ट्र राज्याचा कायम रहिवाशी आहे, त्यासंबंधीचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे.

(ड) सध्या मी कोणत्याही कला शाखेचा विद्यार्थी नाही.

(३) मी खालील स्वरुपात कलाकृतीची डिजिटल प्रतिमा सीडीमध्ये सादर करीत आहे.

(३००dpi) कलाकाराचे नाव__विभाग__अ.क्र.__शिर्षक__किंमत.jpg

उदा: Ashok-Kadam__Painting__१__Landscape__२९०००.jpg

Ashok-Kadam__Painting__२__Portrait__३००००.jpg

(४) मी सादर केलेली/केलेल्या कलाकृती प्रदर्शन संपल्यानंतर दहा दिवसाच्या आत परत न नेल्यास सदर कलाकृतीवर माझा हक्क राहणार नाही व कला संचालनालयाने ती नष्ट केल्यास माझी कोणतीही हरकत अथवा तक्रार राहणार नाही.

ठिकाण :- कलाकाराची स्वाक्षरी

दिनांक-

## ६० वे महाराष्ट्र राज्य कला प्रदर्शन, २०१९-२०
### कलाकार विभाग

विभाग क्रमांक- अनुक्रमांक- (कार्यालयीन कामकाजाकरीता)

श्री./श्रीमती/कुमारी :______________________________

यांच्याकडून राज्य कला प्रदर्शनाच्या खाली नमूद केलेल्या विभागांसाठी एकूण ( ) कलाकृती मिळाल्या.

(१) रेखा व रंगकला
(२) शिल्पकला
(३) उपयोजित कला
(४) मुद्राचित्रण (ग्राफिक्स)
(५) दिव्यांग

ठिकाण: मुंबई कला संचालकांकरीता,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

दिनांक-

प्रदर्शक अथवा त्याच्या अधिकृत मध्यस्थाने कलाकृती परत नेताना ही पावती दाखल करणे आवश्यक आहे. पावती नसल्यास कलाकृती परत दिल्या जाणार नाहीत.

**वर नमूद केलेल्या एकूण____________कलाकृती परत मिळाल्या.**

मुंबई कलाकार अथवा त्यांनी
दिनांक- त्याच्या प्राधिकृत केलेल्या
प्रतिनिधीची स्वाक्षरी